# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-26.06.2026** **वार- शनिवार**

---

**<u>मुख्यमंत्री सारथी कार्यालय भेट</u>**

मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक उन्नतीसाठी शिक्षण, कौशल्य विकास, स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण, उद्योजकता आणि आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित संधी उपलब्ध करून देण्याचं धोरण राज्य शासनानं स्वीकारलं असून, या उद्दिष्टासाठी स्थापन झालेल्या सारथी संस्थेच्या माध्यमातून झालेलं कार्य उल्लेखनीय आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुण्यात केलं.

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण आणि मानव विकास संस्था, सारथी पुणेच्या वतीनं गणेश कला क्रीडा मंच इथं आयोजित संघ लोकसेवा आयोग, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, तसंच विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या पालकांच्या सन्मान सोहळ्यात मुख्यमंत्री बोलत होते.
दरम्यान, मुख्यमंत्र्यांनी सारथी मुख्यालयास भेट देऊन तेथील उपक्रमांची माहिती घेतली. शासनाकडे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात येईल, असं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.
तर, समता, बंधुता, सामाजिक न्याय आणि तळागाळातील विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे विचार सारथीच्या कार्यातून प्रत्यक्षात येत असल्याचे गौरवोद्गार उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी यावेळी काढले.
यावेळी उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, महापौर मंजुषा नागपुरे, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रतापसिंह, मनपा आयुक्त नवलकिशोर राम, आदि प्रशासकीय अधिकारी उपलब्ध होते.

**<u>पुण्याचे सांस्कृतिक धोरण</u>**

सांस्कृतिक राजधानी असा नावलौकिक असलेल्या पुणे शहराचं सांस्कृतिक धोरण आजपर्यंत निश्चित करण्यात आलेलं नाही. ते करण्याचा आपला मानस असून त्यासाठी कलाकारांचा सहभाग आवश्यक आहे. त्यामुळे या महत्त्वपूर्ण कार्यात कलाकारांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवावा, असं आवाहन महापौर मंजुषा नागपुरे यांनी केलं.

बालगंधर्व रंगमंदिराचा 58 वा वर्धापन दिन महापौरांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. त्यावेळी त्या बोलत होत्या.

बालगंधर्व रंगमंदिराच्या पुनर्विकासासंबंधी बोलताना, बालगंधर्व रंगमंदिर ही कलाकार आणि कला रसिकांसाठी जिव्हाळ्याची ऐतिहासिक वास्तू आहे. पुनर्विकासाच्या नावाखाली ही ऐतिहासिक वास्तू पाडण्याचा कोणाचाही विचार नाही. कलाकार आणि रसिकांच्या सोयीसाठी अधिक सुविधा निर्माण करणे हाच पुनर्विकासाचा मुख्य हेतू असल्याचं महापौरांनी यावेळी स्पष्ट केले.

**<u>पोलिओ लसीकरण</u>**

पुणे शहरासह,पिंपरी चिंचवड महानगरपालिका वैद्यकीय विभागामार्फत उद्या संपूर्ण शहरात 'राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण' मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेअंतर्गत शहरातील ५ वर्षापर्यंतच्या सर्व बालकांना पोलिओ प्रतिबंधक लस देण्यात येणार आहे.
पिंपरी चिंचवड शहरात सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत १ हजार १२३ पोलिओ लसीकरण केंद्रांवर ही मोहीम राबविण्यात येणार आहे.

शहरातील सर्व महापालिका दवाखाने, रुग्णालये, मोठी खासगी रुग्णालये, अंगणवाडी केंद्रे, बस स्थानके, रेल्वे स्थानके, मेट्रो स्थानके तसेच स्थलांतरित नागरिकांच्या वस्त्यांमध्ये पोलिओ लसीकरणाची व्यवस्था करण्यात आली आहे.

**<u>केतन आगरवाल हत्या</u>**

पुण्यातलं केतन अग्रवाल हत्या प्रकरण जलदगती न्यायालयात चालवायला आणि या प्रकरणी उज्ज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करायला राज्य सरकारनं मंजुरी दिली आहे. या तरुणाच्या वडिलांनी आज पुण्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. दोषींना कठोर शिक्षा व्हावी यासाठी तसंच मृताच्या कुटुंबियांना न्याय देण्यासाठी वचनबद्ध असल्याचं

मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**<u>प्रॉप कनेक्ट २०२६</u>**

प्रॉप कनेक्ट २०२६ या देशातील सर्वात मोठ्या एकदिवसीय रियल इस्टेट सल्लागार परिषदेचं रविवारी ६ जुलैला पुण्यात आयोजन  करण्यात आलं आहे देशातील ३८ शहरांतील दोन हजारांहून अधिक स्थावर मालमत्ता व्यवसायिक ३०० हून अधिक विकसक यामध्ये सहभागी होणार आहेत, अशी माहिती 'प्रॉप'चे अध्यक्ष उदयन माने यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. पुण्याच्या भविष्यातील विकास, कृत्रिम बुद्धिमत्ता, ऑटोमेशन, उद्योजकता  यांसारख्या विषयांवर परिषदेमध्ये तज्ज्ञांचे मार्गदर्शन होणार आहे.

**<u>कृषिदिन पुरस्कार वितरण</u>**

पुणे विभागातील पुणे, सोलापूर आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील कृषी फलोत्पादन आणि संलग्न क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या २२ शेतकऱ्यांना विविध कृषी पुरस्कार जाहीर झाले असून १ जुलै रोजी कृषी दिनी राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात येणार असल्याची माहिती विभागीय कृषी सहसंचालक बाबासाहेब जेजुरकर यांनी दिली  आहे. पुरस्कारप्राप्त शेतक-यांपैकी अहिल्यानगर जिल्ह्यातील ५, पुणे जिल्ह्यातील ८ तर सोलापूर जिल्ह्यातील ९ शेतकरी आणि कर्मचाऱ्यांची निवड करण्यात आली आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज आकाश अंशतः ढगाळ होतं. पुणे जिल्ह्यात हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**